Scan QR code to visit... Epaper Portal

दैनिक

www. sahyandrinews.com

# सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit... Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १९० • Title - Code :- MAHMAR49513 • शुक्रवार दि.१२ एप्रिल २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.




# मोदीजींच्या विकास गाडीला काँग्रेसचे पंक्चर चाक लावू नका

## ना.सुधीर मुनगंटीवार यांचे चंद्रपूरच्या जनतेला जाहीर आवाहन

## पठाणपुरा,बाबूपेठ,बंगाली कॅम्प परिसरात जाहीर सभांना उदंड प्रतिसाद

**चंद्रपूर (प्रतिनिधी)–देशाचे कर्तृत्ववान प्रधानमंत्री नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वात संपूर्ण भारत देशाची प्रगती होत आहे. देश विकासाच्या दृष्टीने वाटचाल करीत असताना काँग्रेसचे पंक्चर चाक मोदींच्या विकास गाडीला लावू नका, चंद्रपूर लोकसभा क्षेत्रात काँग्रेसचे पंक्चर झालेले चाक आता पाच वर्ष दुरुस्त होऊच शकत नाही, अशी जोरदार टीका करीत चंद्रपूर–आर्णी–वणी लोकसभा मतदारसंघाचे भाजपा , शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस मित्र पक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार ना. सुधीर मुनगंटीवार यांनी काँग्रेस पक्षावर निशाणा साधला आहे.**

चंद्रपूर शहरातील पठाणपुरा बाबू पेठ आणि बंगाली कॅम्प येथे लोकसभा निवडणूक प्रचारार्थ नुकतीच जाहीर सभा पार पडली. या सभेला ते मार्गदर्शन करताना बोलत होते पुढे बोलताना ते म्हणाले की, लोकशाहीचा सर्वात मोठा उत्सव हा लोकसभा निवडणूक असतो हा उत्सव आता जवळ आलेला आहे. या उत्सवात मागील वर्षी केलेली चूक यावर्षी होऊ नये याची प्रत्येकांनी काळजी घेतली पाहिजे. मागील साडेचार वर्षात या चंद्रपूर लोकसभा क्षेत्राचा विकास खुंटला आहे त्यामुळे आता आपण सर्वांनी विकासासाठी मतदान करा असे आवाहन मी करतो. चंद्रपूरकरांनी जेव्हा जेव्हा मला विकास काम करण्याची संधी दिली तेव्हा तेव्हा मी तुमच्या सर्वांच्या विश्वासास पात्र ठरलो आहे, हे तुम्हाला माझ्या मतदार संघात केलेल्या विकासकामांवरून दिसून येते. चंद्रपूर लोकसभा क्षेत्रातील कुठलेही गोरगरीब कुटुंबातील मुलींच्या शिक्षणात गरिबी आडवी येणार नाही. यासाठी ६०० कोटी रुपये खर्च करून आपण एसएनडीटी युनिव्हर्सिटीची निर्मिती करीत आहोत. त्यामध्ये ६२ नवीन कोर्सेस सुरू होतील त्याचा या क्षेत्रातील गरीब कुटुंबातील मुलींना त्याचा फायदा होईल याचा मला विश्वास आहे.

डॉक्टरकडे गेल्यावर आपण त्याची जात विचारत नाही. तो माझ्या जातीचा असेल तर उपचार घेईल अन्यथा उपचार घेणार असे आपण म्हणत नाही. गवंडी कामगार हा माझ्या जातीचा असेल तरच मी घर बांधणार अन्यथा घर बांधणार नाही असा आपण विचार करीत नाही. कटिंग दाढी करायची असेल तर माझ्या जातीच्याच दुकानात जाऊन कटिंग दाढी करेल, याचा विचार आपण करत नाही. मग आपण निवडणुक आल्यावरच जात का बघतो? असा प्रश्न ना. मुनगंटीवार यांनी विचारला.

निवडणुकांमध्ये जातीपातीच्या राजकारणाला बगल दिली पाहिजे. जे उमेदवार मतदार संघाचा विकास करू शकत नाही, ते जातीपातीवर मत मागतात. मी कधी राजकारणात जात बघितली नाही, मी केलेल्या विकास कामांवर आजपर्यंत निवडून आलो आहे. त्यामुळे आपण सुज्ञ मतदारांनी जात न बघता जो विकास कामे करतोय अशाच उमेदवाराला तुम्ही संधी दिली पाहिजे, असे आवाहन ना. मुनगंटीवार यांनी केले.

यावेळी ना. मुनगंटीवार यांनी केलेल्या विकास कामांच्या यादीचा पाढा जाहीर सभेत वाचून दाखविला. जाहीर सभेपूर्वी लक्ष्मीनारायण देवस्थान तसेच श्री व्यंकटेश स्वामी समर्थ मंदिर येथे भेट देऊन त्यांनी सहपरिवार स्वामी समर्थांचा आशीर्वाद घेतला. यासोबतच सकाळी गांधी चौक पासून पदयात्रेला ना. मुनगंटीवार यांनी सुरूवात केली. गोलबाजार, टिळक मैदान, भाजी मार्केट, सराफा लाईन पदयात्रा ना. मुनगंटीवार यांनी काढली. यावेळी केळी विकणारे, शेवग्या विकणारे, फुल विक्रेते, किराणा दुकानदार व्यावसायिकांनी सुधीर मुनगंटीवार यांना आर्शीवाद दिला. यासोबतच चंद्रपूरातील व्यावसायिकांकडून ना. मुनगंटीवार यांचा सत्कार करण्यात आला. या पदयात्रेमध्ये चंद्रपूरकर मोठया संख्यने सुधीरभाऊ आप आगे बढो हम तुम्हारे साथ है हा नारा देत सहभागी झाले.पठाणपुरा बाबूपेठ आणि बंगाली कॅम्प परिसरात झालेल्या जाहीर सभेला भाजपा महानगरचे जिल्हाध्यक्ष राहुल पावडे, ज्येष्ठ नेते प्रमोद कडू, शिवसेना जिल्हाप्रमुख नितीन मते, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बंडू हजारे, राजू कक्कड, सुरज पेदूलवार, किरण बुटले, प्रज्वलंत कडू, रामपाल सिंह, सविता कांबळे, बाजार मंडळ अध्यक्ष सचिन कोतपल्लीवार, अजय सरकार, दिनकर सोमलकर, नगरसेवक संगीता खांडेकर, विशाल निंबाळकर, चंद्रकला सोयाम, तुषार सोम, राजीव गोलीवार, भरत गुप्ता, प्रतिभा ठाकूर, रवी चहारे, रमेश भुते, राजेंद्र खांडेकर, धनंजय हुड, श्याम बोबडे, सुभाष आदमने, अजय सरकार, डॉ. दीपक भट्टाचार्य, राजश्री जुमडे, कल्पना बगुलकर, ज्योती गेडाम, प्रदिप किरमे, शाम कनकम, दीपक कामनवार, मनीषा चौधरी, कविता सोमनाथ जाधव, चंद्रकला जाधव, सविता कांबळे, तुषार सोम यांच्यासह मित्रपक्ष महायुतीचे कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विजय वडेट्टीवार यांचा लवकरच भाजपमध्ये प्रवेश

### धर्मरावबाबा आत्राम यांच्या दाव्याने खळबळ



**आत्राम यांची 'नार्को' टेस्ट करा – वडेट्टीवार**

महायुतीला पराभव समोर दिसत असल्याने त्यांचे नेते काहीही दावे करत सुटले आहे. मंत्री धर्मरावबाबा आत्राम यांना पराभव झाला की मंत्रिपद जाईल याची भीती आहे. त्यामुळे ते मला त्रास देण्यासाठी असा दावा करीत आहे. ते जर खरंच कथित बैठकीत हजर होते तर त्यांची 'नार्कोटेस्ट' करा, सत्य काय ते समोर येईल. आत्राम यांनी स्वतःच्या क्षेत्रातून भाजपला लीड मिळवून द्यावे असे आव्हान विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केले आहे.

**गडचिरोली (वृत्तसंस्था)**–लोकसभेच्या पहिल्या टप्प्यातील निवडणुकीसाठी सुरू असलेल्या प्रचाराचा पहिला टप्पा पूर्ण झाला असून नेत्यांमध्ये आरोप प्रत्यारोपाचा सामना रंगला आहे. यात राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री धर्मरावबाबा आत्राम यांनी राज्याचे विरोधीपक्षनेते विजय वडेट्टीवार लवकरच भाजपमध्ये प्रवेश करणार असा दावा केल्याने ऐन निवडणुकीत खळबळ उडाली आहे. यावर वडेट्टीवार यांनी प्रत्युत्तर देत दावा तथ्यहीन असल्याचे सांगितले. गडचिरोली–चिमूर लोकसभेसाठी महायुती आणि महाविकास आघाडीच्या नेत्यांनी संपूर्ण शक्ती पणाला लावली आहे. काँग्रेसकडून विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार तर महायुती कडून मंत्री धर्मरावबाबा आत्राम यांच्यात चांगलाच कलगीतुरा रंगल्याचे चित्र आहे. दरम्यान, बुधवारी मंत्री आत्राम यांनी विजय वडेट्टीवार लवकरच भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याचा दावा केल्याने पुन्हा एकदा वादाची ठिणगी पडली आहे. वडेट्टीवारांच्या प्रवेशासंदर्भात झालेल्या बैठकीत मी स्वतः उपस्थित होतो, असे आत्राम यांनी स्पष्ट केल्याने राजकीय वर्तुळात चर्चा उधाण आले आहे. त्यामुळे ऐन लोकसभा निवडणुकीत काँग्रेसच्या नेत्यांमध्ये संभ्रम निर्माण झाल्याचे पाहायला मिळत आहे.

## अंगात नाही बळ अन् चिमटा काढून पळ अशी विरोधकांची अवस्था–मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**नागपूर**–महायुतीचे रामटेक लोकसभेचे उमेदवार राजू पारवे आणि नागपूरचे उमेदवार नितीन गडकरी यांच्या प्राचारासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची रामटेकमध्ये सभा पार पडली. या सभेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विरोधकांवर सडकून टीका केली.



विरोधी पक्ष मोदींवर वारंवार आरोप करतात. पण मोदी त्यांच्याकडे जराही लक्ष देत नाहीत. मोदीजी जर त्यांच्याकडे जराही फिरकले तर फेसबुक लाईव्ह करणाऱ्याच्या तोंडातून फेस बाहेर येईल. पण एक म्हण आहे, हाथी चले बाजार,...., अशी टीका मुख्यमंत्री शिंदे यांनी विरोधकांसह नाव न घेता उद्धव ठाकरे यांच्यावर केली.पंतप्रधान नरेंद्र मोदी हे छत्रपती शिवाजी महाराजांना अभिप्रेत सुराज्य निर्माण करत आहेत. इसलिए फक्त हर घर मोदी नाही, तर मन–मन मोदी आहे. हे संपूर्ण देशात बघायला मिळत आहे. त्यामुळे सत्तेच्या खुर्चीसाठी विरोधी पक्ष वेडा झाला आहे. त्यांचं जीवन मोदीद्वेषाने पीडित आहे. ज्यांचं जीवन फक्त भ्रष्टाचार, घोटाळे आणि रोकडा मोजण्यात व्यथित झालं त्यांना मोदींवर आरोप करण्याचा नैतिक अधिकार नाही. त्यामुळेच मराठीत एक म्हण आहे, अंगात नाही बळ आणि चिमटा काढून पळ अशी त्यांची अवस्था आहे, अशी टीका एकनाथ शिंदे यांनी केली.आता सर्व रेकॉर्ड मोदी तोडतील. कारण देशाची ४० कोटी जनता मोदींसोबत आहे. त्यामुळे एनडीएकडे आत्मविश्वास तर इंडिया आघाडीकडे अहंकार आहे. आत्मविश्वास विजयाच्या दिशेला नेतो तर अहंकार विनाशाकडे नेतो. त्यामुळे प्रभू रामांनी अहंकारी रावणाचा विनाश केला होता, असा घणाघात एकनाथ शिंदेंनी केला.देशाची जनता अहंकारची लंका जाळून खाक करुन टाकेल. विरोधकांकडे नीती नव्हे अन् नियमही नाही. त्यामुळे ते सत्तेत बाहेर आहेत. साप आणि मुंगूसची जी मैत्री झालीय ते जनतेला माहिती आहे. त्यामुळे आगामी निवडणुकीत त्यांना घरचा रस्ता दाखवण्याचं काम आपल्या सर्वांना करायचं आहे, असेही एकनाथ शिंदे म्हणाले.

## महायुतीला पाठिंबा देताच राज ठाकरेंना धक्का

**डोंबिवली**–लोकसभा निवडणुकीत राज ठाकरे यांनी महायुतीला बिनशर्त पाठिंबा देण्याची घोषणा केल्यानंतर राज्यभरात त्याचे पडसाद उमटत आहेत. राज ठाकरे यांच्या डोंबिवलीतील मनसे पदाधिकाऱ्यांनी राजीनामा दिले आहेत. तर राज ठाकरे यांनी महायुतीला पाठिंबा दिल्याने ठाण्यातील उत्तर भारतीय पदाधिकाऱ्यांनी देखील ठाकरे गटाची वाट धरल्याची घटना समोर आली आहे.

डोंबिवलीतील मनसेचे पदाधिकारी मिहिर दवते यांच्यासह सात जणांनी राजीनामा दिला आहे. राज ठाकरे यांच्या बदलत्या भूमिकेमुळे कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम वाढल्याने मी राजीनामा दिल्याचे मिहिर दवते यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले. मनसेच्या सोशल मिडिया ग्रुपवर राजीनामा दिला आहे. राज ठाकरे यांच्या भूमिकेनंतर डोंबिवलीतील अनेक मनसे पदाधिकाऱ्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. त्यामुळे आता डोंबिवलीत राजीनाम्याचे लोण आणखी पसरणार का? मनसेला राज्यभरात खिंडार बसणार का, असा सवाल देखील उपस्थित केला जात आहे.राज ठाकरे यांच्या निर्णयानंतर मनसेचे सरचिटणीस किर्तीकुमार शिंदे यांनी फेसबुकवर पोस्ट शेअर करत मनसेला अलविदा करत असल्याचे जाहीर केले होते. २०१९ मध्ये लोकसभा निवडणुकांवेळी राज ठाकरे यांनी मोदी–शाह यांच्याविरोधात भूमिका घेतली होती. आज अत्यंत निर्णायक क्षणी राजसाहेबांनी राजसाहेबांनी भूमिका बदलली.

## 'अवकाळी'चा शंभर गावांना फटका, साडेतीन हजार हेक्टरवरील पिकांची हानी

### ३०९ घरांची पडझड



**बुलढाणा:** ९ एप्रिलला झालेल्या वादळी अवकाळी पाऊस व गारपिटीचा जिल्ह्याला जबर तडाखा बसला आहे. बुधवारी संध्याकाळी उशिरा कृषी व महसूल यंत्रणांनी जिल्हा प्रशासनाला नुकसानीचा अहवाल सादर केला. यानुसार ६ तालुक्याना अवकाळीचा फटका बसला आहे.

प्राथमिक सर्वेक्षण नुसार 'अवकाळी'चा १०२ गावांना फटका बसला असून तब्बल साडेतीन हजार हेक्टरवरील पिकांची हानी झाली आहे. यामुळे मका, भुईमूग, ज्वारी, बाजरी, कांदा, भाजीपाल्याचे नुकसान झाले आहे. याशिवाय फळबागांचे नुकसान झाले आहे. प्रामुख्याने आंब्याची मोठ्या प्रमाणावर पडझड झाली आहे. याशिवाय १४ गावांतील ३०९ घरांची आंशिक पडझड झाली आहे. वीज पडून व झाडाखाली दबून १३ जनावरे दगावली आहे. संग्रामपूर तालुक्यातील तिघेजण वीज पडून गंभीर जखमी झाले. राहुल छळकर, विशाल छळकर, मोहन डोंगरे अशी जखमींची नावे असून ते ट्रॅक्टर ने जात होते.


# ग्रंथात गोमाजी महाराजांच्या सर्व लीला संकलित!

**श्री गजानन महाराजांना वंदनीय असलेले संत गोमाजी महाराज होत. ते भगवान श्रीकृष्णाचे निस्सीम भक्त होते. शेगावचे संत श्री गजानन महाराज हे देखील ज्यांना वंदन करायचे, असे विदर्भातील थोर संत म्हणून श्री गोमाजी महाराज यांचा परिचय आहे. श्रीक्षेत्र पंढरपूर येथे येणाऱ्या शेगावीच्या गजानन महाराज यांच्या पालखीचा पहिला मुक्काम श्री गोमाजी महाराज संस्थान नागझरी येथे असतो. आज या संत गोमाजी महाराज यांचा वार्षिक यात्रोत्सव आहे. अधिक माहिती श्रीकृष्णदास निरंकारी– बापू यांच्या सदर लेखातून वाचा... संपादक.**

श्री क्षेत्र शेगांवपासून अवघ्या ६ किलोमीटरवर मन नदीच्या तीरावर श्रीक्षेत्र नागझरी वसलेले आहे. येथे श्री संत गोमाजी महाराजांचे समाधी मंदिर आहे. श्री नागेश्वराचे पुरातन मंदिर आणि अखंड झुळझुळणारे पाण्याचे पवित्र झरे यामुळे या गावाला नागझरी हे नाव मिळाले. श्री गोमाजी महाराज कृष्णभक्त होते, पण त्यांची पंढरपूरच्या विठ्ठलावर प्रगाढ श्रद्धा होती. शेगाव येथून श्री संत गजानन महाराज यांची पालखी दरवर्षी पंढरपूरकडे प्रस्थान ठेवते. त्यानंतर पालखीचा पहिला मुक्काम याच नागझरी मंदिर परिसरात असतो.

संत श्री गजानन महाराज हे देखील पंढरपूर येथे वारीसाठी जाताना नागझरी इथं आवर्जून थांबायचे आणि संत श्री गोमाजी महाराज यांचे दर्शन घ्यायचे, असे भाविक सांगतात. गोमाजी महाराजांनी गजानन महाराजांच्या रुपात पुन्हा अवतार घेतला, असेही भक्त मानतात. श्री गजानन विजय या ग्रंथामध्ये गोमाजी महाराजांच्या सर्व लीला संकलित केल्या आहेत. संतश्रेष्ठ गोमाजी महाराज यांच्यावरील एक आरती प्रसिद्ध आहे. त्यात त्यांनी केलेल्या अनेक लीलांचा समावेश आहे. त्यांच्यामुळे नागझरी येथे जणू पंढरी अवतरली, अशी कल्पना मांडण्यात आली आहे. त्यामुळे गोमाजी महाराज यांचा जनमाणसावरील प्रभाव आणखी ठळक होतो.

जयजयाजी महाराज जयजय सद्गुरू गोमाजी।
भावभक्तीनें विठ्ठल तुम्हीं ठेवियला राजी।।
(संत गोमाजी महाराज आरती: चरण क्र. १ व २.)



संकलन व सुलेखन
श्री कृष्णकुमार गो. निकोडे गुरुजी.
पोटेगावरोड, गडचिरोली,
फक्त मधुभाष– ७१३२७९६६८३.

संतशिरोमणी गोमाजी महाराज हे कोण? ते कोठून आले? नागझरी येथे त्यांचे कसे वास्तव्य झाले? याबद्दल ठोस अशी माहिती उपलब्ध नाही. पण, काही भाविकांच्या मते, करंजपूर– कारंजा येथील प्रख्यात स्वामी नरसिंह सरस्वती त्यांच्या सात शिष्यांसह नागझरी येथे आले. त्यांनी महाशिवरात्रीच्या



दिवशी गोदावरी स्नान घडावे, म्हणून त्यांनी गोदावरीला आवाहन केले. त्यानंतर तेथे गोदावरी आली आणि सोबतच नागेश्वर, त्र्यंबकेश्वर, विश्वेश्वर, सोमेश्वर आणि गुप्तेश्वर ही पाच स्वयंभू शिवलिंगे प्रगट झाली. कालांतराने याच ठिकाणी श्री गोमाजी महाराज नावाचे साक्षात्कारी संत अवतरले आणि त्यांच्याच प्रभावाने नागझरी हे गाव श्रीक्षेत्र म्हणून लौकिकास आले.

देहू, आळंदी, पैठण, चाफळ, तेर वा अरण।
त्याच परीचें झालें आम्हां नागझरी स्थान।।
संत गोमाजी महाराज आरती: चरण क्र. ३ व ४.

गुरू–शिष्याची यात्रा म्हणून प्रसिद्ध असलेल्या मुक्ताईनगर येथील मुक्ताई–चांगदेव यात्रा प्रसिद्ध आहे. या यात्रेसाठी संत गोमाजी महाराज यांची पालखी नागझरी येथून निघते. प्रस्थान ठेवल्यानंतर शेगावपासून ते मुक्ताईनगरपर्यंत प्रत्येक ठिकाणी पालखीची मानाची पूजा केली जाते. ही प्रथा वर्षानुवर्षे सुरू आहे. शेगाव संस्थानची खरी प्रगती ज्यांच्या मार्गदर्शनाखाली झाली, ते कर्मयोगी शिवशंकरभाऊ पाटील यांच्या कुटुंबीयांचे गुरू म्हणून श्री गोमाजी महाराज ओळखले जातात. शेगावच्या श्री गजानन महाराज संस्थानप्रमाणेच श्री गोमाजी महाराज संस्थानचा कारभारदेखील सचोटीने केला जातो. अनेक धार्मिक–आध्यात्मिक तसेच, समाजाभिमुख कार्यक्रम संस्थानद्वारे केले जातात. त्यामुळेच श्री गोमाजी महाराज संस्थानने पंचक्रोशीत स्वतंत्र ठसा उमटवला आहे. अलीकडच्या काळापर्यंत या गावात नैसर्गिक पाण्याचे झरे होते. त्यामुळे हे गाव नागझरी म्हणून ओळखले जाऊ लागले. श्री संत गोमाजी महाराजांचे भव्य मंदिर, अद्भूत गोमुख कुंड, स्वयंभू शिवलिंगाची पाच हेमाडपंथी शिवमंदिरे आणि निसर्गरम्य परिसर यामुळे नागझरी हे गाव एक तीर्थक्षेत्र तसेच, पर्यटन स्थळ म्हणून नावारूपास आले आहे. येथे दरवर्षी हजारो भाविक–पर्यटक येतात. त्यामुळे स्थानिकांना रोजगारही उपलब्ध होतो.

अवघ्या संता–ठायीं आम्हां तव हे द्वयचरण।
फार कशाला बोलावें हो तुम्हीच भगवान ।।
(संत गोमाजी महाराज आरती: चरण क्र. ५ व ६.)

अशा शब्दांत गोमाजी महाराज यांची महती वरील आरती काव्यात वर्णिली आहे.

!! गोमाजी महाराज यांच्या भक्तीमार्ग शिकवणीस त्यांच्या यात्रोत्सवानिमित्त त्यांना दंडवत प्रणाम !!

## सर्व पथकांनी उमेदवारांच्या निवडणूक खर्चाच्या अचूक नोंदी ठेवाव्यात–अन्वर अली



**हिंगोली । प्रतिनिधी**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार निवडणूक पारदर्शक व भयमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी निवडणूक विषयक सर्व बाबींवर बारकाईने लक्ष ठेवून खर्चाच्या अचूक नोंदी ठेवण्याच्या सूचना निवडणूक निरीक्षक (खर्च) अन्वर अली यांनी आज कळमनुरी येथील भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम सभागृह येथे आढावा बैठकीत दिल्या. हिंगोली लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने आज निवडणूक खर्च निरीक्षक अन्वर अली यांनी आढावा घेतला. निवडणूक कालावधीमध्ये तक्रार असल्यास निरीक्षक अन्वर अली यांच्याशी (७६६६८७८३७५) व त्यांचे संपर्क अधिकारी गणेश वाघ (९९२३०४०७३३) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी उपविभागीय अधिकारी तथा सहायक निवडणूक अधिकारी श्रीमती क्रांती डोंबे, संपर्क अधिकारी गणेश वाघ, तहसीलदार सुरेखा नांदे उपस्थित होते. राजकीय पक्षाचे सनियंत्रण करण्यासाठी विविध समिती व भरारी पथकाची नेमणूक करण्यात आली आहे. यामध्ये व्हिडिओ सनियंत्रण समिती (व्हीएसटी), व्हिडीओ पाहणारा चमू (व्हीव्हीटी), स्थिर संनियंत्रण चमू (एसएसटी), लेखांकन करणारा चमू, भरारी पथक, माध्यम प्रमाणीकरण आणि संनियत्रण समितीच्या पथक प्रमुखांनी खर्चाच्या नोंदी अचूक ठेवाव्यात. उमेदवाराने घेतलेल्या खर्चाचा ताळमेळ नोंदी व पथकप्रमुखाच्या नोंदी अचूक असल्याची बाब जाणीवपूर्वक तपासून घ्यावी. अभिरुप नोंदवहीतील नोंदी अद्यावत ठेवाव्यात. तसेच एसएसटी आणि एफएसटी या पथकांनी आपली जबाबदारी दक्षतेने पार पाडावी. निवडणूक कालावधीमध्ये तपासणी नाक्यांवर तपासणी करताना कोणतीही दिरंगाई करू नये, कर्तव्यावर असलेल्या पथक प्रमुख आणि पथकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी हलगर्जीपणा केल्यास योग्य ती दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असे निर्देश अन्वर अली यांनी यावेळी सांगितले.

लोकसभा मतदार संघ व विधानसभा मतदार संघनिहाय सहायक निवडणूक खर्च निरीक्षकांनी दैनंदिन नोंदी त्याच दिवशी अभिरुप ताळमेळ नोंदवहीत अचूकपणे नोंदवाव्यात. यामध्ये अजिबात दिरंगाई होणार नाही, याची दक्षता घ्यावी. तसेच उमेदवारांचे निवडणुकीशी संबंधित स्वतंत्र बँक खाते असणे आवश्यक आहे. उमेदवारांच्या बँक खात्यातून दैनंदिन काढण्यात येणाऱ्या रकमेवर बारकाईने लक्ष ठेवावेत. तसेच सर्व पथक प्रमुखांनी समन्वयाने काम करावेत. इतर विभागाशी संबंधित माहिती मिळाल्यास ती माहिती संबंधित विभागास कळवावी. जेणेकरुन त्याच्यावर कारवाई करणे सोयीचे होईल. तसेच मतदार संघात मद्य वाटप होणार नाही यावर लक्ष ठेवावे, अशा सूचना श्री. अन्वर अली यांनी दिल्या.

## विकासाचा सांख्यिकी आराखडा तयार करणारा अहिल्या नगर जिल्हा राज्यात एकमेव–ना.विखे पाटील

### व्यापारी असोसिएशनच्या वतीने संवाद कार्यक्रम संपन्न



**अहमदनगर । प्रतिनिधी**

विकासाचा सांख्यिकी आरखडा तयार करणारा अहील्यानगर जिल्हा राज्यात पहीला असून,औद्योगिक आणि तिर्थ क्षेत्र पर्यटनातून होणारी गुंतवणूक व्यापारी पेठेवरही सकारात्मक परीणाम करण्यास कारणीभूत ठरेल असा विश्वास महसूल तथा पालक मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केला.

अहील्यानगर आडते बाजार मर्चन्टस असोसिएशन व कांदा भाजीपाला फळे फुले अडत्यांचे असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात मंत्री विखे पाटील यांनी व्यापारी क्षेत्रातील सर्व घटकांशी संवाद साधला. आ.संग्राम जगताप अध्यक्ष अशोक गांधी उपाध्यक्ष गोपाल मणियार सेक्रेटरी संतोष बोरा राजेंद्र बोरा अशोक लाटे भाजपाचे अध्यक्ष अभय आगरकर माजी नगराध्यक्ष वसंत लोढा धनंजय जाधव निखिल वारे आदी उपस्थित होते.

आपल्या भाषणात मंत्री विखे पाटील म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाची परीस्थिती आज बदलत आहे.कोव्हीड संकटा नंतरही देशाची अर्थव्यवस्था स्थिर करण्यासाठी केलेल्या उपाय योजनामुळे आज भारताची अर्थव्यवस्था प्रगतीच्या दिशेने जात आहे.जगातील इतर देशाची परीस्थिती पाहीली तर भारत देश अर्थिक दृष्ट्या सक्षम असल्याचे चित्र आहे.

देशाचा विकास साध्य करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी फुटपाथवरील विक्रेत्यापासून ते उद्योजकापर्यत सर्वानाच पाठबळ देण्याचा प्रयत्न केला आहे.सर्वाचे प्रयत्न देशाच्या अर्थव्यवस्थेला पाच ट्रीलीयन डॉलर अर्थव्यवस्थेचा मार्ग अधिक सुकर करून देईल आशी अपेक्षा विखे पाटील यांनी व्यक्त केली.

नगर जिल्ह्याच्या विकासाचा आराखडा तयार करण्यात आला असून यामध्ये प्रामुख्याने औद्यगिक विकासाला प्राधान्य देण्यात आल्याचे सांगून मंत्री विखे पाटील म्हणाले की तिर्थ क्षेत्राचा विकास करून नवी बाजारपेठ विकसित करण्याच्या अनुषंगाने जिल्ह्याचा सांख्यिकी आरखाडा तयार केला असून यामाध्यमातून जिल्ह्याच्या विकासाचे नियोजन करण्यात येणार असल्याची माहीती त्यानी दिली.शहरातील बाजारपेठेची परंपरा खूप मोठी असून शहराच्या व जिल्ह्याच्या विकासात व्यापारी बंधूचे योगदान खूप मोठे आहे.केंद्र सरकारकडे वस्तूसेवा करातील अडचणी सोडविण्याची ग्वाही देताना आतापर्यत अर्थमंत्र्यांनी घेतलेल्या परीषदांमधून जीवनावश्यक वस्तूवरील कर रद्द किंवा कमी करण्याचा निर्णय करून जनतेला आणि व्यापारी वर्गाला दिलासा देण्याचा प्रयत्न केला आहे.आता हा कर भरण्यात सुध्दा सुसूत्रता आली असल्याचे विखे पाटील म्हणाले.याप्रसंगी आ.संग्राम जगताप अध्यक्ष गांधी राजेंद्र बोरा निखील वारे यांची याप्रसंगी भाषण झाली.

## अनिल राठोडांचा मावळा नीलेश लंके यांनाच आमचे मत

### नगर शहरात महाविकास आघाडीच्या प्रचारास सुरुवात

**अहिल्यादेवीनगर । प्रतिनिधी**

महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांच्या प्रचाराचा शुभारंभ पाडव्याच्या दिवशी विजयाची गुढी उभारुन करण्यात आला. लंके यांच्या प्रचारार्थ शहरात काढण्यात आलेल्या फेरीदरम्यान सर्वसामान्य नागरिकांनी उत्स्फुर्त प्रतिसाद देत स्व. अनिलभैय्या यांच्या मावळ्यालाच आमचे मत अशा भावना व्यक्त केल्या. नीलेश लंके यांच्या प्रचाराचा शुभारंभ नगर शहरातील नेता सुभाष चौक येथे विजयाची गुढी उभारुन करण्यात आला. याप्रसंगी जि.प.सदस्या राणीताई लंके, शिवसेना जिल्हाप्रमुख प्रा.शशिकांत गाडे, शहरप्रमुख संभाजी कदम, राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी महापौर अभिषेक कळमकर, काँग्रेसचे किरण काळे, युवा सेनेचे विक्रम राठोड, भगवान फुलसौंदर, बाळासाहेब बोराटे, गिरिष जाधव, संजय शेंडगे, अशोक गायकवाड, अमोल येवले, अरुणा गोयल, प्रशांत गायकवाड, मनोज गुंदेचा, अशोकराव बाबर, नामदेव पवार, सुदाम भोसले, दिघे अण्णा, अनिस चुडिवाल, विलास उबाळे, आकाश आल्हाट, उषा भगत, रोहिदास भालेराव, सुनिता भांबरे, उमेश भांबरकर, सचिन ढवळे, आसाराम कावरे, सुनिल त्रिपाठी, अशोक दहिफळे, संतोष गेनप्पा, दिपक खैरे, दिलदारसिंग बिर आदिंसह महाविकास आघाडीचे सर्व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



नगरमध्ये सेवा, संरक्षण हे मुद्दे घेऊन स्व.अनिलभैय्या राठोड यांनी सलग २५ वर्ष या शहराचे नेतृत्व केले. त्यांनी शिवसेनेचा बाल्लेकिल्ला असलेले नगर शहर सक्षमपणे सांभाळले. नागरिक निर्भय होते. राठोड यांच्या पश्चात त्यांचे शिलेदार असलेले नीलेश लंके हे नगर दक्षिण मतदार संघाचे नेतृत्व करणार असून आम्ही अनिल राठोड यांचा विचार मानणारे सर्वसामान्य लोक लंके यांनाच पसंती देणार असल्याच्या भावना नागरिकांनी व्यक्त केल्या.

महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांना मोठ्या मताधिक्क्यांनी निवडून देत उत्तेरेच पार्सल आपल्याला परत पाठवाचे आहे. शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठकारे यांचा हिंदूत्वाचा व समानतेचा नारा दिला. नगर शहरात स्व.अनिल राठोड यांनी २५ वर्षे आमदारकीच्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेची सेवा केली. लोकसभा निवडणुकीसाठी आता महाविकास आघाडीचे उमेदवार निलेश लंके यांना मोठ्या मताधिक्क्याने निवडून आणून नगर दक्षिण लोकसभेवर महाविकास आघाडीची विजयाची गुढी उभारायचीच व उत्तरतेतील प्रस्थापितांचे पार्सल आपल्या येथून हुसकावून लावायचे असा निर्धार करुन कामाला लागा असे आवाहन शिवसेनेचे (ठाकरे गट) शहरप्रमुख संभाजी कदम यांनी केले.

अभिषेक कळमकर म्हणाले, शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली राज्यात महाविकास आघाडीचे उमेदवार नेत्रदिपक कामगिरी करुन मोठ्या मताधिक्क्यांनी विजयी होणार आहेत. नीलेश लंके यांच्या विजयासाठी राष्ट्रवादीसह शिवसेना ठाकरे गट, राष्ट्रीय काँग्रेस, आपचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या ताकदीने या निवडणुकीत उतरले आहेत. नगर दक्षिणेतून नीलेश लंके हे सर्वसामान्यांचे नेतृत्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात असल्याने त्यांना मोठे मताधिक्क्य मिळेल असा विश्वास कळमकर यांनी व्यक्त केला.किरण काळे म्हणाले, नगर दक्षिणच्या विद्यमान खासदाराने गेल्या पाच वर्षात मतदार संघासाठी काहीही केले नाही. ते निवडून दक्षिणतून येतात आणि विकास उत्तरेत करतात. येणाऱ्या लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांना भरघोस मतांनी निवडून देऊन निष्क्रय खासदाराला पुन्हा उत्तरेत पाठवावे असे आवाहन केले. लंके यांच्यामागे जनताच उभी राहिली आहे. महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनाही त्यांच्या विजयासाठी कंबर कसली असल्याची पुष्टी काळे यांनी जोडली. शिवालय येथे विजयी गुढी उभारल्यानंतर नवीपेठ, अर्बन बँक रोड, कापड बाजार, मोची गल्ली, सराफ बाजार, दाळ मंडई, आडते बाजार आदि परिसरातून प्रचारफेरी काढण्यात आली. त्यास व्यापारी, व्यवसायिक, नागरिकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.

## मंत्री विखे पाटील यांचा पारनेर मध्ये भेटीचा धडाका

### समाजसेवक आण्णासाहेब हजारे,विजय औटीची घेतली भेट



**पारनेर । प्रतिनिधी**

गुढी पाडव्याचा मुहूर्त साधून महसूल तथा पालक मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी तालुक्यात भेटीगाठीचा धडाका लावला.जेष्ठ समाजसेवक आण्णासाहेब हजारे यांच्यासह विधानसभेचे माजी उपाध्यक्ष विजयराव औटी यांच्याशी संवाद साधत कार्यकर्त्यांना सूचना केल्या.

दोन दिवसांपुर्वी महायुतीचे उमेदवार खा.डॉ.सुजय विखे पाटील यांना आलेली धमकी आणि या घटनेचे जिल्ह्यात उमटलेले पडसाद पाहाता पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी केलेला पारनेर दौरा लक्षवेधी ठरला आहे.

या दौर्यात जेष्ठ समाजसेवक आण्णासाहेब हजारे यांची राळेगण येथे भेट घेवून मंत्री विखे पाटील यांनी पाडवा आणि नव वर्षाच्या शुभेच्छा दिल्या.या दोघा मध्ये सुमारे अर्धातास बंद दारा आड चर्चा झाली.मात्र या चर्चाचा तपशिल समजू शकला नाही.

महायुतीचे उमेदवार खा डॉ सुजय विखे पाटील यांना जीवे मारण्याच्या आलेल्या धमक्याचा संवाद समाज माध्यमामध्ये प्रसारीत झाल्या नंतर त्याचे पडसाद जिल्ह्यात उमटले.प्रसारीत झालेला संवाद आणि त्यातील व्यक्ति विरोधी उमेदवारांचे समर्थक असल्याची चर्चाही सुरू झाली.याविरोधात महायुतीच्या वतीने पुरावे सादर करून संबंधित व्यक्ति विरोधात कारवाई करण्याची मागणी निवडणूक निर्णय अधिकारी आणि जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे करण्यात आली आहे.

या घटनेनंतर मंत्री विखे पाटील यांचा पारनेरचा दौरा महत्वपूर्ण मानला जात आहे.या दौर्यात पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्याशी संवाद साधून प्रचाराचा कानमंत्र सुध्दा दिला आहे.आगामी काळात तालुक्यातील प्रचाराचे नियोजन तसेच मतदारपर्यत पोहोचण्यासाठी नियोजन करण्याच्या दृष्टीने त्यांनी महत्वपूर्ण सूचना केल्या.विशेष म्हणजे विधानसभेचे माजी उपाध्यक्ष विजयराव औटी यांची निवासस्थानी जावून मंत्री विखे पाटील यांनी भेट घेतली.एक तासाच्या भेटीला विशेष महत्व आले आहे.

# बौद्ध धर्मियांची स्वतंत्र ओळख निर्माण होण्याची गरज-डॉ.राजरत्न आंबेडकर

**जालना । प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पाहिलेल्या स्वप्नांची पूर्तता करण्यासाठी बौद्ध धर्मियांची स्वतंत्र ओळख निर्माण होण्याची गरज भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. राजरत्न आंबेडकर यांनी येथे विषद केली. भारत देश हा'कॅशलेस नव्हे तर ' कास्टलेस' होणे गरजेचे असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

जालना शहरात सोमवारपासून सुरू झालेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमालेचे पहिले पुष्प गुंफतांना ते बोलत होते. स्वामी विवेकानंद हायस्कूलच्या मैदानावर आयोजित या पहिल्या पुष्पाच्या अध्यक्षस्थानी बदनापूरचे माजी आमदार अरविंदराव चव्हाण हे होते. रिपाइंचे जालना जिल्हाध्यक्ष गणेशराव रत्नपारखे, जयभीम सेनेचे संस्थापक अध्यक्ष सुधाकर निकाळजे, काकडे ट्रान्सपोर्टचे संचालक दत्ता पाटील काकडे, खादगावचे माजी सरपंच गौतम हिवाळे आदी यावेळी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमालेचे अध्यक्ष आण्णासाहेब चित्तेकर, सचिव संजय हेरकर, कोषाध्यक्ष भास्कर घेवंदे, उपाध्यक्ष रवी खरात,,दावलवाडीचे सरपंच बबनराव जाधव, भारतीय बौद्ध महासभेचे जालना जिल्हाध्यक्ष प्रेमानंद मगरे आदींची विचारपीठावर उपस्थिती होती.

'बौद्ध समाजाची स्वतंत्र व्यवस्था' या विषयावर विचार मांडतांना डॉ. राजरत्न आंबेडकर पुढे म्हणाले की, भारतीय संविधान एकीकडे अमृतमहोत्सवी वर्षात पदार्पण करीत असतांना हे संविधान हटविण्याची भाषा केली जात आहे, भारतीय संविधान स्वीकारण्यास संपूर्ण जग तयार झाले असतांना हे संविधान हटविण्याचा प्रयत्न संविधान विरोधी मंडळी करीत आहेत. संविधान निर्मितीच्यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान हे टिकणार नाही, अशी भीती वर्तविली होती, ती भीती खरी होतांना वाटत आहे. संविधानातील मुख्य तरतुदीचा फायदा घेऊन मोकळी झालेल्या मंडळीना आता संविधानाविषयी काही आस्था राहिलेली नाही, मागासवर्गीय समाजाने संविधानाचा उपयोग केवळ शिष्यवृत्ती व नोकरीसाठीच घेतला आहे, त्यांनी संविधानाची पाने कधी उघडून पाहिली नाहीत, त्यामुळेच संविधान निर्मितीला विरोध करणाऱ्या मंडळीच्या हाती आज संविधान गेले आहे, ते संविधानाचा आदर कसा करतील? संविधानाला विरोध करणाऱ्या मंडळीच्या हाती संविधान गेल्याने त्याचा अवमान केला जात आहे,देशातील १४० कोटी जनतेचे रक्षण करणारे संविधान बदलण्याची भाषा केली जात आहे, धर्माच्या नावाखाली सत्ता हाकणाऱ्या मंडळींनी देशाची अर्थव्यवस्था ' कॅशलेस' करून टाकली आहे, मुळात देशाला 'कॅशलेस' नव्हे तर ' कास्टलेस' करण्याची गरज आहे. =भारतीय बौद्ध महासभेची निर्मिती करीत असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी एक ध्येय निश्चित केले होते,त्यांनी आपल्या समाजाला सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक संपन्नता प्रदान करून भारताला सम्राट अशोकाच्या बौद्धमय भारताची निर्मिती करण्याचा संकल्प हाती घेतला होता. मात्र बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाण नंतर त्यांच्या वारसांनी स्वतःला आत्मकेंद्री करून ही चळवळ नष्ट केली आणि बाबासाहेब आंबेडकरांनी पाहिलेल्या स्वप्नाचा चुराडा केला. त्यामुळे आता फक्त डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पाहिलेल्या स्वप्नाला पूर्णत्वास नेण्यासाठी बौद्धांची स्वतंत्र व्यवस्था निर्माण करणे हेच आपले ध्येय आहे. जगभरात १३८ देशात बौद्ध धर्म असलेल्या देशाने बौद्ध धर्माची स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे, भारतातही बौद्ध




धर्मियांची स्वतंत्र ओळख निर्माण होण्याची गरज आहे, बौद्ध धर्मियांच्या स्वतंत्र शैक्षणिक, आर्थिक, आरोग्य विषयक संस्था निर्माण होण्याची गरज आहे, त्यासाठी आपण प्रयत्नशील असून बौद्ध धर्मियांची स्वतंत्र व्यवस्था निर्माण झाल्याशिवाय या समाजाचे अस्तित्व सिद्ध होणार नाही, असेही डॉ. राजरत्न आंबेडकर यांनी सांगितले.प्रमुख अतिथी म्हणून बोलतांना जयभीम सेनेचे संस्थापक अध्यक्ष सुधाकर निकाळजे म्हणाले की, २०२४ ची लोकसभा निवडणूक ही आंबेडकरी चळवळीसाठी महत्त्वाची आहे,तसेच आंबेडकरी चळवळीचे अस्तित्व सिद्ध करणारी आहे,आंबेडकरी जनतेने ड.बाळासाहेब आंबेडकर यांचे हात बळकट करावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानामुळे आपण घडलो असून याच संविधानामुळे आपण यशस्वी उद्योजक झालो असल्याची भावना काकडे ट्रान्सपोर्टचे संचालक दत्ता पाटील काकडे यांनी यावेळी बोलतांना व्यक्त केली. अध्यक्षीय समारोप करतांना बदनापूरचे माजी आमदार अरविंदराव चव्हाण म्हणाले की, प्रत्येक धर्माचे स्वतंत्र सामाजिक व धार्मिक आचरण असते, हिंदू धर्माप्रमाणे बौद्ध धर्मात जातीच्या उतरंडी नाहीत, त्यामुळे जगात बौद्ध धर्माचे आचरण मोठ्या प्रमाणात केले जाते,बौद्ध धर्मियांची स्वतंत्र ओळख निर्माण व्हावी, यासाठी डॉ. राजरत्न आंबेडकर हे बौद्ध धर्माला जागृत करण्याचे कार्य करीत आहेत, बौद्ध समाजाने बौद्ध धर्माचे आचरण केले तर या समाजाची प्रगती निश्चित होईल, असेही ते म्हणाले.

प्रास्ताविक करतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमालेचे अध्यक्ष आण्णासाहेब चित्तेकर म्हणाले की, जालना शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमाला अविरतपणे सुरू ठेवण्याचे श्रेय हे जालना शहरातील आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ नेते मंडळी व कार्यकर्त्यांना आहे, महापुरुषांचे परिवर्तनवादी विचार तळागाळातील जनतेपर्यंत पोहचवण्याचे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमालेच्या माध्यमातून होत असल्याचे त्यांनी सांगितले. प्रारंभी डॉ. राजरत्न आंबेडकर व इतर मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रतिमा पूजन तसेच द्वीप प्रज्वलन करण्यात आले. व्याख्यानमालेचे अध्यक्ष आण्णासाहेब चित्तेकर, सचिव संजय हेरकर, कोषाध्यक्ष भास्कर घेवंदे, उपाध्यक्ष रवी खरात, सहसचिव बालकिशन पैठणे आदींनी मान्यवरांचे स्वागत केले. संचालन प्रभाकर घेवंदे यांनी तर अमोल खरात यांनी आभार मानले.

यावेळी ज्येष्ठ सामाजिक नेते ड. बी. एम. साळवे, ड. ब्रह्मानंद चव्हाण, सुभाष गाडगे, सुदामराव सदाशिवे,अंकुश चव्हाण, राम साळवे, सुनील साळवे, महेंद्र रत्नपारखे,डॉ. विजय कुमठेकर, गयाबाई साळवे, मनकर्णाबाई डांगे, भारती हेरकर, भास्कर साळवे, सुनील रत्नपारखे,अमर डांगे, मिर्झा अन्वर बेग, विजय खरात, विनोद रत्नपारखे, सतीश वाहुळे,राहुल प्रधान, सुलेखा मनवर,छाया हिवाळे, वैशाली सरदार, संतोष घडे, कैलास रत्नपारखे, रविंद्र बोर्डे, डॉ. सुशील सूर्यवंशी, रविंद्र काकडे, वैभव नालेगावकर, बंडू सुरडकर, प्रविण चित्तेकर, सुहास साळवे, भगवान तायड, रिंकल तायड यांच्यासह आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते, नागरीक, महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# गद्दारांनो उद्धव साहेब संपले म्हणता तर टिका कशा साठी करता-खा.संजय जाधव

**पाथरी । प्रतिनिधी**

शिवसेना पक्ष प्रमुख प्रामाणिक पणे राज्य चालवत असतांना काहिंनी गद्दरी केली.शिवसेना पक्षाची चिन्हा सह चोरी करत उद्धव ठाकरे संपल्याची भाषा करणारे गद्दार मात्र सकाळी उठल्या पासुन उद्धव साहेबां वर टिका करतात. संपलेल्या माणसावर टिका करता मात्र आता जनता तुम्हाला संपवल्या शिवाय गप्प बसणार नसल्याची टिका खा संजय जाधव यांनी सोमवारी पाडव्या दिवशी वाघाळा येथे झालेल्या सभे दरम्यान बोलतांना केली.



या वेळी डॉक्टर सेल चे डॉ राम शिंदे,उपजिल्हा प्रमुख रविंद्र धर्मे,तालुका प्रमुख मुंजाभाऊ कोल्हे,जि प चे माजी सदस्य माणिकअप्पा घुंबरे,युवासेनेचे अविराज टाकळकर,पांडुरंग शिंदे,पं स चे माजी सदस्य पिंकू शिंदे,काँग्रेस चे जिल्हाउपाध्यक्ष विजयकुमार घुंबरे,युवक काँग्रेस चे डॉ महेश कोल्हे यांची या वेळी उपस्थीती होती.पुढे बोलतांना खा जाधव म्हणाले की भाजप सरकार च्या घोषणा म्हणजे नुसती जुमलेबाजी असून शेतक-यांचे उत्पन्न दुप्पट करतो म्हणणारे प्रत्यक्षात शेती मालाचे भाव पाडून राहिल्याने आज शेतकरी मोठ्या संकटात सापलेला आहे. खताच्या किमती भरमसाठ वाढवल्या त्यात त्या परत दहा किलो खत कमी हे भाजप सरकार म्हणजे नुसते लुटारू असल्याची खा जाधव यांनी या वेळी करत आबकी बार चार सौ पार म्हणनारे इतर पक्षांची फोडा फोडी का करताहेत?असा सवाल करत भाजपाला या वेळी विजयाची खात्री नसल्यानेच ते फोड तोड करत इडी,सिबीआयचा वापर करत असल्याचा आरोप करत जातियवादाचे राजकारण बीजेपी करत असल्याचे म्हणाले.भाजपाच्या जातीच्या राजकारणाला जनता भिकघालनार नसल्याचा विश्वास ही खा जाधव यांनी या वेळी व्यक्त केला. या सोबतच आम्हीच हिंदू धर्माचे रक्षक असल्याचे दाखवत अर्धवट राम मंदिराचे उदघाटन आटोपले पण या साठी कोणी संघर्ष केला हे जनतेला चांगले माहिती असल्याचे ही ते या वेळी म्हणाले.गद्दारांना मतदार योग्य जागा दाखऊन देत जनता पुन्हा उद्धव ठाकरेंना साथ देईल असा विश्वास व्यक्त करत.आपण एक नव्हे तर दोन मेडिकल कॉलेज परभणी साठी आणले पुढील पाच वर्षात आपण परभणीचा चेहरा मोहरा बदलण्याचा प्रयत्न निश्चित करू असे आश्वासन देत या वेळी पहिल्यांदाच कोणत्याही पक्षाचे अधिकृत चिन्ह नसल्या ने ही निवडणुक मतदारां साठी ही आव्हाण असून शिवसेनेची मशाल परभणी मतदार संघात नक्कीच धगधगेल असा विश्वास खा जाधवांनी व्यक्त केला.या वेळी प्रास्ताविक उपजिल्हाप्रमुख रविंद्र धर्मे यांनी केले तर सुत्र संचालन सचिन वाघ यांनी केले. या वेळी मुस्लिमबांधवांना खा जाधव यांचा सत्कार केला. या कार्यक्रमासाठी वाघाळा येथील सर्व समाजाचे नागरीक मोठ्या संखेने उपस्थित होते.

# हेमंतराव आडळकर यांना सर्वोत्कृष्ट चेअरमन पुरस्काराने सन्मानित

**सेलू । प्रतिनिधी**

सेलू येथील साईबाबा नागरी सहकारी बँकेचे अध्यक्ष व माजी नगराध्यक्ष श्री हेमंतराव मुरलीधरराव आडळकर यांना नवी दिल्ली येथील ऑल इंडिया बिझनेस डेव्हलपमेंट ऑफ इंडिया अँड ग्लोबल सोसायटी फॉर हेल्थ अँड एज्युकेशन ग्रोथ प्रमोटिंग अचिव्हमेंट्स फाउंडेशनच्या अत्यंत प्रतिष्ठेच्या 'बेस्ट चेअरमन परफॉर्मन्स अवॉर्ड फॉर को-ऑपरेटिव्ह बँक डेव्हलपमेंट विथ मेडल' पुरस्कार ११जानेवारी २४रोजी जाहीर झाला होता तो आज दिनांक ९एप्रिल २०२४ मंगळवार रोजी दिल्ली येथील कार्यक्रम मध्ये गौरविण्यात आले या फाऊंडेशनचे प्रा.के. एस. राणा (व्हाईस चान्सलर ऍडव्हाईजरऑफ मिनिस्ट्री ऑफ सोशल जस्टीस अँड एम्पोमेंट).डाँ जितेंद्र सिंग शँटी,(पदमश्री अवॉर्ड प्रिसीडेन्ट ऑफ शहीदभगत सिंग सेवादल एस बी एस फौंडेशन ),हरिपाल रावत (जॉईंट सेक्रेटरी .ऑल इंडिया काँग्रेस कमेटी आसाम ).सी. एस.व्ही. एन. बी मूर्ती ट्रेड कमिशनर .(फायनलंड ),डाँ सुरेश चंद्र दिल्ली (आय ए एस )यांच्या प्रमुख उपस्थिती नवी दिल्लीत आयोजित कार्यक्रमात पुरस्कार प्रदान केला




आहे . या वेळी उपाध्यक्ष श्री चंद्रशेखकर मुळावेकर, दतरावं आंधळे, मु. का. अधिकारी श्री रामराव लाडाने, श्री विलास पौळ उपस्थिती होती,पुरस्काराबद्दल आडळकर यांचे विविध स्तरांतून अभिनंदन होत आहे.ग्राहकांना सेवा व उत्कृष्ट प्रशासन, सामाजिक बाधिलकी जपत श्री हेमंत आडळकर यांच्या कार्यातून दिसून येते त्यांनी सेलू नगर परिषद चे नगराध्यक्ष पद, जिल्हा मध्यवर्ती बँक चे संचालक पद भूषविलेलं आहे संपूर्ण जिल्ह्यात एक चांगली ओळख आहे जिल्हायात साईबाबा नागरी बँक च्या सहा शाखा कार्यरत आहे,
या पुरस्कार बद्दल त्याचे अभिनंदन होत आहे

# पाच रुपयात आरओचे वीस लिटर थंड पेयजल वाघाळा ग्रा पं च्या स्थुत्य उपक्रमाचा प्रारंभ

**पाथरी । प्रतिनिधी**

अगदी माफक दरात वाघाळा ग्रामस्थांना आरओचे शितल जल अगदी पाच रुपयात वीस लिटर शुद्ध पाणी पुरवठ्याची योजना गुढी पाडव्याच्या पावन पर्वावर नविन मराठी वर्षांच्या प्रारंभी सरपंच बंटी पाटलांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेल्या या योजनेचा शुभारंभ गावचे प्रतिष्ठीत नागरीक तथा चेअरमन गणेश पाटील घुंबरे यांच्या हस्ते ग्रामस्थांच्या उपस्थितीत सुरू झाले.



अगदी पाणी टंचाईच्या काळात ही योग्य नियोजनाने वाघाळा ग्रामस्थांना दोन टप्यात रोटेशन नुसात तीन पाणी पुरवठ्याच्या जलकुंभातून एक दिवस आड भरपुर प्रमाणात पाणी पुरवठा करण्यात येत आहे. यातच नागरीकांना अल्प दरात आरओचे शुद्ध थंडगार पाणी मिळावे या साठी सरपंच बंटी पाटील याचे प्रयत्न होते. मागिल महिण्यात या साठीची यंत्र सामुग्री खरेदी करून गावातील जनावराच्या शासकीय उपकेंद्रातील इमारतीत आरओची यंत्रणा बसवली गेली. सोमवार ९ एप्रिल रोजी चेअरमन गणेशराव घुंबरे पाटील यांच्या हस्ते आणि ग्रामस्थांच्या उपस्थितीत या शितल शुद्ध पेयजलाचे लोकार्पण गुढी पाडव्याच्या शुभ मुहूर्तावर संपन्न झाले. वाघाळा ग्रामस्थां सह या मार्गावरुन जाणा-या प्रवाशांना ही अगदी पाच रुपयात विस लिटर पाणी मिळणार आहे. ही यंत्रना मानव रहित असून पाच रुपयांचा बंदा मशीन मध्ये टाकल्यास चोविस तास विस लिटर पाणी घेता येणार आहे. येत्या काही महिण्यात नविन पाणी पुरवठ्याच्या पाणी टाकीचे काम ही पुर्णत्वास जाऊन पुढील अनेक वर्षाचा पाणी पुरवठ्याचा प्रश्न मार्गी लागणार असल्याचे सरपंच बंटी पाटील यांनी सांगितले.

# बोरी येथे रमजाननिमित्त इफ्तार पार्टीचे आयोजन

**कौसडी । प्रतिनिधी**

जिंतूर तालुक्यातील बोरी येथील शिव निर्मल मंगल कार्यालयात दिनांक ८ एप्रिल सोमवार रोजी मुस्लिम बांधवांच्या पवित्र रमजान निमित्त जिल्हा परिषद चे माजी उपाध्यक्ष अजय चौधरी यांच्या वतीने इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. या इफ्तार पार्टीमध्ये बोरी व कौसडी परिसरातील नागरिकांनी उपस्थिती लावली होती

सध्या मुस्लिम बांधवांचा पवित्र रमजान महिना हे अंतिम टप्प्यात आला असून या रमजान महिन्यामध्ये मुस्लिम बांधव रोजा ठेवतात तसेच अल्लाहाची प्रार्थना करतात व कुराआण ग्रंथाची पठण करतात. मुस्लिम समाजातील नागरिक महिला लहान मुले तप-तपत्या उन्हात १३ ते १४ तास रोजा (उपवास) ठेवून महिनाभर अल्लाह ईश्वराची प्रार्थना करत असतात. जिल्हा परिषद चे माजी उपाध्यक्ष अजय चौधरी हे दरवर्षी रमजान महिन्यांमध्ये



इफ्तार पार्टीच्या माध्यमातून हिंदू मुस्लिम बांधवांना एकत्र आणून एकोप्याचे दर्शन घडवितात. या इफ्तार पार्टीमध्ये माजी सभापती अशोकराव चौधरी पृथ्वीराज भांबळे, सुभाष घोलप, मौलाना अब्दुल मकसूद, खारी एकबाल,अमन खान पठाण, प्रदीप चौधरी, शेख रफिख, विजयकुमार चौधरी, सखाराम सोंग, शशिकांत चौधरी, शौकत लाला, बाबर खान पठाण, शेख बिलालोद्दीन, राहुल कनकुटे, राजू बहिरट, संतोष चौधरी, सुदाम नितनवरे, करून नागरे, अमर चौधरी, अभिजीत चौधरी, प्राध्यापक जावेद कुरेशी, शेख फिरोज, शेख खुद्दूस, मोहम्मद गुत्तेदार, मज्जित कुरेशी, अन्वर पटेल, शेख असलम,वाजेद अन्सारी, डॉ.किरण बकान, डॉ.लक्ष्मण जाधव,भारत ठाकूर यांच्यासह परिसरातील हिंदू मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. हे कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी कैलास डाके, विजय चिमणकर,सलीम खान पठाण, माऊली चालमोठे, अमोल वाकळे, पद्माकर शिंपले,राजू चौधरी यांनी परिश्रम घेतले होते

# मोदींच्या नेतृत्वाखाली विजयाची गुढी उभारणार-खा.डॉ.सुजय विखे पाटील

**अहिल्यादेवीनगर । प्रतिनिधी**

देशात पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली विजयाची गुढी उभारणार असा विश्वास विद्यमान खासदार आणि दक्षिण अहिल्यानगर मतदार संघाचे उमेदवार डॉ. सुजय विखे पाटील यांनी व्यक्त केला. पारिजात पार्क येथील गुढीपाडव्याच्या निमित्त आयोजित केलेल्या शोभा यात्रेत ते बोलत होते. देशाचा निकाल ठरला असून, नरेंद्र मोदीच हे पुन्हा देशाचे पंतप्रधान असतील असेही त्यांनी लोकांना संबोधित करताना सांगितले.

गुढीपाडव्याच्या निमित्त अहिल्यानगर येथील प्रोफेसर चौक ते पारिजात चौक येथे शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पारंपारिक वेशभूषेत सहभागी झालेल्या नागरिकांना विद्यमान



खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी गुढीपाडवा आणि हिंदू नूतन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी बोलताना सुजय विखे पाटील यांनी सांगितले की, मागील १० वर्षाच्या काळात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला दिशा दिली असून, हा केवळ ट्रेलर आहे. पूर्ण पिक्चर अजून बाकी आहे. येणाऱ्या काळात मोदींच्या माध्यमातून भारत आर्थिक महासत्ता म्हणून उदयास येईल. भारतातील जनतेने मोदींचे नेतृत्व स्वीकारले असून या निवडणुका केवळ औपचारिकता आहे. येत्या ४ जूनला ४०० पारचे ध्येय सहज गाठता येणार आहे. मोदींच्या माध्यमातून ५०० वर्षापासून रखडलेलल्या प्रभूरामचंद्राच्या मंदिराची निर्मिती झाली यामुळे देशात हिंदुत्वाला मोठे बळ आले आहे. साडेतीन मुहूर्तापैकी एक असणारा गुढी पाडव्याचा सण हा अतिशय महत्त्वाचा आणि शुभ मुहूर्त म्हणून मानला जातो. रामायण काळात गुढी पाडव्याच्या दिवशी रावणाच्या अत्याचारातून रामाने लोकांना मुक्त केले. तेव्हा तिथल्या लोकांनी आपला आनंद व्यक्त करण्यासाठी घराघरात विजयाचा झेंडा फडकावला होता. त्याचप्रमाणे मोदींच्या नेतृत्वात देशातून भ्रष्टाचार, दडपशाही आणि हिंदू विरोधी शक्तींचे उच्चाटन होऊन देशात हिंदूत्वाचा पाया मजबूत होईल असा आत्मविश्वास डॉ. सुजय विखे पाटील यांनी व्यक्त केला आहे. सुजय विखे यांनी आपल्या प्रचारातून लोकांचा संपर्क वाढविला आहे. यामुळे येणाऱ्या लोकसभा निवडणुकीत त्यांना याचा मोठा फायदा होणार असल्याचे चित्र दिसत आहे.

# स्वामीनामाच्या जयघोषाने दुमदुमले अक्कलकोट

**अक्कलकोट :** राज्यासह देशभरातील भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री स्वामी समर्थ महाराजांच्या प्रकट दिनानिमित्त श्री वटवृक्ष स्वामी समर्थ मंदिरात श्री स्वामी समर्थ महाराजांचा प्रकटदिन सोहळा हजारो भाविकांच्या उपस्थितीत मोठ्या भक्तिभावाने व श्रद्धेने पार पडला. दिवसभरात हजारो भाविक स्वामीचरणी नतमस्तक झाले. स्वामीनामाच्या जयघोषाने अवघी अक्कलकोट नगरी दुमदुमली.स्वामी प्रकटदिनी पहाटे ५ वाजता श्रींची काकड आरती मंदिराचे पुजारी मोहनमहाराज यांच्या हस्ते समितीचे चेअरमन महेश इंगळे यांच्या उपस्थितीत करण्यात आली. तत्पूर्वी श्री स्वामी समर्थांच्या १४६ व्या पुण्यतिथी महोत्सवानिमित्त सालाबादाप्रमाणे पार पडणाऱ्या नगरप्रदक्षिणा-प्रभात फेरीस आज स्वामी समर्थांच्या प्रकटदिनी पहाटे काकड आरतीपूर्वी सुरवात झाली.काकड आरतीनंतर श्री स्वामी समर्थ सेवासार संघाच्यावतीने श्री स्वामी समर्थांना फळ व मिठाईचे ५६ भोग नैवेद्य दाखविण्यात आले व नंतर हा नैवेद्य भाविकांना प्रसाद म्हणून वाटण्यात आला. यानंतर स्वामी भक्तांच्या गर्दीमुळे स्वामींचे दर्शन भाविकांना सुलभतेने होण्याकरिता सर्व स्वामीभक्तांना दुतर्फा रांगेतून दर्शनास सोडण्यात आले.सकाळी १० ते १२ या वेळेत ज्योतिबा मंडपात देवस्थानचे चेअरमन महेश इंगळे, प्रथमेश इंगळेंच्या प्रमुख उपस्थितीत विश्वस्ता उज्वलाताई सरदेशमुख व सहकाऱ्यांचा सत्संग, महिला भजनी मंडळाच्यावतीने भजन व नामस्मरण सोहळा, त्यानंतर हजारो स्वामीभक्तांच्या उपस्थितीत श्रींच्या पाळण्यातील मूर्तीवर गुलाबपुष्प वाहून श्रींचा पाळणा संपन्न झाला.

# महात्मा ज्योतिबा फुले समाज विकासाचे अखंड ऊर्जास्रोत - डॉ.हेमराज निखाडे







**गडचिरोली । प्रतिनिधी**

महात्मा जोतिबा फुले आधुनिक महाराष्ट्रातील पहिले युगप्रवर्तक मराठी कवी, नाटककार आणि विचारवंत आहेत. महाराष्ट्रातीलच नव्हे तर संपूर्ण भारतातील सामाजिक सुधारणांचा प्रेरणास्रोत म्हणून महात्मा फुले ओळखले जातात. या महामानवाच्या कर्तुत्वामुळेच बहुजन समाजात सामाजिक, सांस्कृतिक बदल घडून आले असून महात्मा ज्योतिबा फुले समाज विकासाचे अखंड ऊर्जास्रोत आहे, असे प्रतिपादन डॉ. हेमराज निखाडे यांनी केले.गोंडवाना विद्यापीठात क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले अध्यासन केंद्राच्या वतीने महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अध्यासन केंद्राचे समन्वयक डॉ. विनायक शिंदे, प्रमुख वक्ते म्हणून गोंडवाना विद्यापीठातील मराठीचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. हेमराज निखाडे तसेच सहाय्यक कुलसचिव डॉ. संदेश सोनुले, इतिहास विभागाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ.प्रफुल नांदे,गणित विभागाचे सहाय्यक प्राध्यापक संदीप कागे, शिवाजी महाराज अध्यासन केंद्राचे समन्वयक डॉ.विकास चित्ते, रसायनशास्त्र विभागाच्या सहाय्यक प्राध्यापिका डॉ. सुषमा वनकर यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते. महात्मा फुले यांच्या कार्याचा उल्लेख करतांना जल, जंगल, जमीन, उद्योजकता, आरोग्य, स्वच्छता, पाणी इत्यादी तसेच शिक्षणातील कौशल्य विकास, आधुनिक शेतीचा प्रयोग, शेतकऱ्यांना शेतीचे प्रशिक्षण अशा विविध कार्याचा राष्ट्रनिर्माण करण्यासाठी घेतलेल्या सहभागाचा व त्यांनी राबविलेल्या विविधांगी योजनांचा डॉ. निखाडे यांनी परिचय करून दिला. अध्यक्षीय भाषण करतांना, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अध्यासन केंद्राचे समन्वयक डॉ. विनायक शिंदे म्हणाले, मानवाचा सर्वात मोठा शत्रू अज्ञान आहे. विद्यार्थ्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून ज्ञान घेत राहावे. आपले ध्येय साध्य करण्यासाठी मेहनत करावी तरच यशस्वी होता येते. असे मोलाचे मार्गदर्शन केले.कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे, मा.प्र-कुलगुरू डॉ. श्रीराम कावळे, मा. कुलसचिव डॉ. अनिल हिरेखन यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांचे सहकार्य लाभले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक महात्मा ज्योतिबा फुले अध्यासन केंद्राच्या समन्वयक डॉ. रजनी वाढई यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन इंग्रजी विभागाचे सहायक प्राध्यापक अतुल गावस्कर यांनी तर आभार अर्थशास्त्र विभागाचे सहायक प्राध्यापक डॉ. महेंद्र वर्धलवार यांनी मानले.



**सध्या आपला उदरनिर्वाह चाल विण्यासाठी जंगलात मोहफुले वेचुन जमा करताना नागरिक.छाया :प्रणय बांगरे.**

# सालगडी पोहचला एक लाख ८० हजारांचे पार

## निम्मी रक्कम गुढीपाडव्याच्या दिवशी हवी-नरेंद्र सुरकार

**सिंदी रेल्वे । प्रतिनिधी**

शेती परवडत नाही,मजुरांची मनधरणी करावी लागते! वगैरे वाक्यांना छेद देत यंदा अनेक शेतकऱ्यांनी चक्क १लाख ८० हजार रुपये सालगड्यास देऊ केले आहे.विशेष म्हणजे वर्षासाठी ठरलेल्या या रकमेपैकी निम्मी रक्कम काल मंगळवारी सालगडी यांच्या हातात देण्यात आली.येथील अनेक शेतकऱ्यांकडील बहुतांश सालगड्यांना दीड लाखांपेक्षा जादा भाव देण्यात आला आहे.

यंदा,मोठ्या प्रमाणात नापिकी आहे,पण घरी किंवा कुटुंबाच्या नावाने असणारी ७०-८० एकर जमीन कसण्यासाठी सालगड्यांची सेवा घेणे गरजेचे ठरते. त्यामुळेच बऱ्याच सधन शेतकरी मंडळींनी सरासरी दीड लाख रुपये वर्षाकाठी सालगड्याला देण्याचे ठरविले. त्यामुळे काही कष्टाळू सालगड्यांना १ लाख ८० हजारपेक्षा जादा भाव देण्यात आल्याचे वृत्त आहे.

त्याशिवाय काही शेतकऱ्यांनी ३६४ दिवसांपैकी १२ दिवसांची मोफत रजा मंजूर केली.तसेच काहींनी आणीबाणीच्या काळात तीन दिवस नि:शुल्क रजा देऊ केली आहे.परंतु,रासायनिक किटक नाशकांच्या फवारणीप्रसंगी खाडा करता येणार नाही! खूपच गरजेचे असेल तर सालगड्याने फवारणी करिता मजूर उपलब्ध करुन देणे अनिवार्य राहील आणि त्या मजुरांचा खर्च सालगडी करेल,अशी अट ठेवण्यात आल्याचे समजते.

निम्मी रक्कम रोख दिल्यानंतर दसऱ्यापर्यंत कोणत्याही परिस्थितीत अतिरिक्त पैसे त्या मजुरास मिळणार नाही,असा करारनामा झाल्याचे एका शेतकऱ्याने खासगीत मान्य केले आहे.परिणामी,यंदा शेतमजुरांच्या रोजंदारीत देखील किमान २५ टक्के वाढ होण्याची शक्यता आहे,एवढे नक्की!

# गोंडवाना विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विविध स्पर्धा

**गडचिरोली**-गोंडवाना विद्यापीठ येथे १४ व १५ एप्रिल रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारताची केलेली पुनर्रचना या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.१४ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण व अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन विद्यापीठ सभागृह (जुनी इमारत) येथे करण्यात आले आहे. तर १५ एप्रिल रोजी सकाळी ११.३० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारताची केलेली पुनर्रचना या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.व्याख्यान कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे मराठी विभाग प्रमुख तथा डॉ. आंबेडकर विचारधारा माजी विभाग प्रमुख डॉ. शैलेन्द्र लेन्डे हे राहणार आहेत. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विद्यापीठाचे मा. कुलगुरु डॉ. प्रशांत बोकारे भुषविणार आहेत तर कार्यक्रमाला प्र-कुलगुरु डॉ. श्रीराम कावळे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. या कार्यक्रमाला विद्यापीठातील शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थीनीनी उपस्थित राहावे, असे विद्यापीठामार्फत कळविण्यात आले आहे.

# सामाजिक कार्यकर्त्या शीतल वाडगुरे यांचा राष्ट्रवादी काँग्रेस मध्ये प्रवेश



**मूल । प्रतिनिधी**

सामाजिक कार्यकर्त्या शितल वाडगुरे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस मध्ये आपल्या महिला सहकार्यांसोबत राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांच्या विकासात्मक दृष्टीकोनाला पाठिबा देत राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष नितीन भटारकर यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष मंगेश पोटवार आणी महिला तालुका अध्यक्ष संगीता गेडाम यांच्या उपस्थितीत पक्षप्रवेश घेतला.

अत्यंत तळागाळातील महिलांच्या प्रश्नांची जाण असलेल्या कार्यकर्त्यां म्हणुन शीतल यांची ओळख असुन येणाऱ्या काळात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून महिलांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी याप्रसंगी सांगितले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे मुल शहर अध्यक्ष आकाश येसनकर, ओबीसी आघाडीचे तालुका अध्यक्ष वासुदेव पिपरे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुका अध्यक्ष रोहित कामडे, तालुका सचिव प्रशांत मेश्राम, तालुका उपाध्यक्ष महेंद्र कोडापे,महिला मुल शहर अध्यक्ष धाराताई मेश्राम, मुल शहराचे अल्पसंख्यांक अध्यक्ष आशु खान, रज्जत कुकडे, माया शेंडे, सुवर्णा रामटेके, रोहित शेंडे, सुरज गिरडकर यांची उपस्थिती होती.

# महात्मा ज्योतिबा फुले यांच्या स्मारकास माल्यार्पण करून आ.किशोर जोरगेवार यांनी केले अभिवादन



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

संपूर्ण जिवन शिक्षण गंगा समाजातील तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी खर्ची घालणा-या क्रांतिसूर्य, ज्ञानदाता महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त आमदार किशोर जोरगेवार यांनी मौलाना अबुल कलाम बागेतील महात्मा ज्यातिबा फुले यांच्या स्मारकास माल्यार्पण करत अभिवादन केले.

यावेळी माळी महासंघाचे चंद्रपूर शहर अध्यक्ष विजय चहारे, माळी सेवा मंडळाचे जिल्हाध्यक्ष राजू बनकर, माजी नगर सेवक नंदु नागरकर, विश्वास बनकर, मधुकर जथाडे, सरदेव इंगोले, कालिदास वाडगुरे, अशोक खडके, बबनराव वानखेडे, विजय राऊत, सचिन निंबाळकर आदींची उपस्थिती होती. क्रांतिसुर्य महात्मा ज्योतिबा फुले हे मराठी भारतीय समाजसुधारक होते. डॉ बाबासाहेब आंबेडकर त्यांना आपले गुरु मानत. गांधीजींनी त्यांना महात्मा म्हणून संबोधले. गुलामगिरी विरुद्ध लढा देण्यासाठी त्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून त्यांनी गुलामगिरी विरुद्ध सतत लढा सुरू ठेवला होता. समाजातील विषमता नष्ट करण्यासाठी तळागाळातील समाजासाठी शिक्षण पोहचवणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. स्त्री ला औषधालाही स्वातंत्र्य न देणा-या समाजात त्यांनी आपली अर्धांगिनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहून मुलींच्या शिक्षणाचा भरभक्कम पाया रचला. त्यांनी समाजासाठी दिलेले विचार हे समाजासाठी अमूल्य भेट असून त्यांचे विचार अंगी सारण्याची आज गरज असल्याची भावना यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी व्यक्त केली. यावेळी समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# वन्यप्राण्यांच्या नुकसानीचे शेतकऱ्यांनी नुकसान भरपाईचा फायदा घ्यावा - विठ्ठलराव बदखल

## रिवाड्र्स संस्था येथे एक दिवसीय शेतकरी यांचे प्रशिक्षण




**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

समाज प्रगती सहयोग धारणी आणि रिवाड्र्स मल्टिपरपोज सोसायटी नागभीड यांच्या संयुक्त विद्यमाने ११ एप्रिल २०२४ गुरुवारला अवॉर्ड कार्यालय नागभीड येथे शेतीपिकांचे वण्यप्राण्यामुळे होणाऱ्या नुकसानीवर उपाययोजना आणि नुकसानभरपाई विषयक एक दिवसीय प्रशिक्षण आयोजित करण्यात आले.

या प्रशिक्षणाला मुख्य मार्गदर्शक म्हणुन विठ्ठलराव बदखल, संस्थापक, अध्यक्ष शेतकरी संरक्षण समिती चंद्रपूर, आणि गुणवंत वैद्य,रिवाड्र्स मल्टिपरपोज सोसायटी संस्थापक, अध्यक्ष नागभीड उपस्थित होते.

यावेळेस मार्गदर्शन करताना विठ्ठलराव बदखल यांनी सांगीतले की, आजच्या युगात शेतीला खूप महत्त्व दिले जाते. पण वन्यप्राणीमुळे शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहेत. त्यावर शेतकऱ्यांनी नुकसान झाल्यावर अर्ज कसा करायचा? त्यासाठी शासन परिपत्रकात कोणत्या प्राणांच्या नुकसानीने किती रुपयांची नुकसान मिळते याबाबत मोलाचे मार्गदर्शन केले.तसेच पशुधन नुकसानी बाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. तसेच गुणवंत वैद्य यानी सांगीतले की, शेतकऱ्यांनी वन्यप्राण्यांच्या हैदोसमुळे झालेल्या नुकसान भरपाईचे ताबडतोब अर्ज वनविभागाला देऊन नुकसान भरपाईचे फायदे घ्यावे, आणि काही अडचण आल्यास आम्ही मार्गदर्शन केव्हा पण देण्यास तयार असणार असे वैद्य यांनी सांगितले.

या कार्यक्रमाला ५० शेतकरी उपस्थित होते.कार्यक्रमाचे संचालन कैलास नन्नावरे तर आभार प्रदर्शन भोजराज नवघडे यांनी केले.प्रशिक्षण यशस्वीतेसाठी प्रफुल मसराम, सूनिता गाठे यांनी सहकार्य केले.

# आमदार किशोर जोरगेवार यांनी मुस्लिम बांधवांना दिल्या ईदच्या शुभेच्छा



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

रमजान ईद निमित्त आमदार किशोर जोरगेवार यांनी लष्कर ईदगाह आणि शाही गुप्त मस्जिद येथे जावून मुस्लिम बांधवांना रमजान ईदच्या शुभेच्छा दिल्यात. यावेळी अनवर खान, साबिर सर, अनवर अली, जहिर काजी, इजहार काजी, अफिसुर रहमान, पोलिस उपाविभागीय पोलिस अधिकारी सुधारकर यादव, शांतता समितीचे रमजान अली घायल, खत्री,रामनगर चे पोलिस निरिक्षक घोडे, यंग चांदा ब्रिगेडचे अल्पसंख्याक विभागाचे शहराध्यक्ष सलिम शेख, युथ अध्यक्ष राशेद हुसेन, इमरान शेख, सय्यद अबरार, व मुस्लिम बांधवांची उपस्थिती होती.

मुस्लिम बांधवांचा पवित्र सण रमजान ईद आज संपूर्ण भारतामध्ये मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली. चंद्रपूरमध्ये सुद्धा ईद उत्साहात साजरी करण्यात आली. चंद्रपूरातील लष्कर ईदगाह आणि शाही गुप्त मस्जिद येथे मस्जिद कमेटीच्या वतीने नमाज पठण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी येथे उपस्थिती दर्शवत ईदगाहमध्ये येणा-या मुस्लिम बांधवांना गुलाबाचे फुल देत रमजान ईदच्या शुभेच्छा दिल्यात. रमजान हा मुस्लिम धर्मातील पवित्र महिना असून ईश्वराची आराधना करत असताना आपले सर्वस्व अर्पण करण्याची शिकवण हा सण आपल्याला देतो. सामाजिक सलोखा आणि बांधिलकी शिकविणारा हा सन असल्याचे ते यावेळी म्हणाले. यावेळी मुस्लिम बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# ना.सुधीर मुनगंटीवार सेवा केंद्रातर्फे महात्मा जोतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन




**घुग्घुस । प्रतिनिधी**

येथील ना. सुधीरभाऊ मुनगंटीवार सेवा केंद्रातर्फे गुरुवार, ११ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता थोर समाजसुधारक आणि महिलांच्या शिक्षणासाठी आग्रही असणारे महात्मा जोतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी भाजपा जिल्हा महामंत्री विवेक बोढे यांनी महात्मा जोतिबा फुले यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून अभिवादन केले.यावेळी भाजपाचे संतोष नुने, अमोल थेरे, सुरेंद्र जोगी, मिलिंद पानघाटे, कोमल ठाकरे, मारोती मांढरे, कुमार कुम्मरवार, सुनंदा लिहीतकर, खुशबू मेश्राम, नेहा कुम्मरवार, संदीप तेलंग, स्वाती गंगाधरे आदींची उपस्थिती होती.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .